# मिरा भाईंदर महानगरपालिका
# माहिती व जनसंपर्क विभाग
# प्रेसनोट

❖ **अनधिकृत फेरीवाल्यांवर सतत कारवाई करण्याचे मा. आयुक्त यांचे सक्तीचे आदेश**

दिनांक ०३ ऑक्टोबर २०२५ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या अध्यक्षतेखाली अतिक्रमण विभागाची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस उपायुक्त (मुख्यालय) कल्पिता पिंपळे, सर्व प्रभाग सहाय्यक आयुक्त तसेच वाहतूक पोलिस विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत शहरातील रस्ते, चौक, फुटपाथ व सार्वजनिक ठिकाणांवर अनधिकृतरीत्या बसलेल्या फेरीवाल्यांवर कारवाई करणेबाबत महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली. नागरिकांना होणारी गैरसोय, वाहतूक कोंडी तसेच सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेवर होत असलेला परिणाम लक्षात घेता, मा. आयुक्तांनी अतिक्रमण विभागाला तात्काळ आणि सातत्यपूर्ण कारवाईचे आदेश दिले. चौकांवर, फुटपाथवर आणि रस्त्यावर बेकायदेशीरपणे फेरी लावणाऱ्यांवर दररोज कठोर कारवाई करण्यात यावी असे मा. आयुक्तांनी निर्देशित केले आहे. ही कारवाई एकदाच करून थांबविण्याऐवजी सतत सुरू राहावी, जेणेकरून शहरामध्ये शिस्तबद्धता आणि स्वच्छता राखली जाईल. तसेच, वाहतूक पोलिस विभागाच्या प्रतिनिधींशी समन्वय साधून रस्त्यांवरील कोंडी कमी करण्यासाठी विशेष लक्ष देण्याचे निर्देश मा. आयुक्तांनी दिले.